**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २० मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्याच्या 13 मतदारसंघात संध्याकाळी 5 वाजेपर्यंत सुमारे 48.66 टक्के मतदान.**
2. **मतदारसंघात मतदारांना आकर्षिक करण्यासाठी करण्यात आल्या विविध उपाययोजना.**
3. **काँग्रेसने वेळोवेळी भारतीय राज्यघटनेचा अवमान केल्याचा पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचा आरोप.**
4. **राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परिक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार.**
5. **इराणचे अध्यक्ष एब्राहिम रईसी आणि परराष्ट्र मंत्री होसैन अमीर-अब्दोल्लाहियान यांचं हेलिकॉप्टर अपघातात निधन.**

*****

**मतदान टक्केवारी**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातलं मतदान आज शांततेत होत आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुमारे ४८.६६ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. राज्यातल्या १३ मतदारसंघांमधे मिळून २६४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, श्रीकांत शिंदे, राजन विचारे, कपिल पाटील, हेमंत गोडसे, अरविंद सावंत हे विद्यमान खासदार तसंच वर्षा गायकवाड, उज्ज्वल निकम, या महत्त्वाच्या उमेदवारांच्या लढती या टप्प्यात होत आहेत. आज सायंकाळी पाच वाजेपर्यंत राज्यात झालेल्या मतदानाची मतदारसंघनिहाय टक्केवारी याप्रमाणे आहे. पाचव्या टप्प्यातील एकूण तेरा लोकसभा मतदारसंघ निहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे : भिवंडी- 48.89 टक्के, धुळे- 48.81 टक्के, दिंडोरी- 57.06 टक्के, कल्याण 41.70 टक्के, मुंबई उत्तर- 46.91 टक्के, मुंबई उत्तर मध्य - 47.32 टक्के, मुंबई उत्तर पूर्व - 48.67 टक्के, मुंबई उत्तर पश्चिम - 49.79 टक्के, मुंबई दक्षिण - 44.22 टक्के, मुंबई दक्षिण मध्य- 48.26 टक्के, नाशिक- 51.16 टक्के, पालघर- 54.32 टक्के, ठाणे - 45.38 टक्के. दरम्यान, सकाळ

पासून सर्वत्र मतदानाचा उत्साह दिसून आला केंद्रीय मंत्री आणि उत्तर मुंबईचे महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांनी सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला. राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस चोक्कलिंगम, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मतदान केलं. याशिवाय अनेक नामवंत व्यक्ती, उद्योजक, सिने अभिनेत्यांनी मतदानाचा हक्क बजावला. ठाणे इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कल्याण लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांनी देखील मतदान केलं.

**वैशिष्ट्यपूर्ण मतदान**

मुंबईतल्या सर्व सहा मतदारसंघात मतदानाचा उत्साह दिसून आला. सकाळपासून अनेक ठिकाणी मतदारांच्या रांगा दिसून येत असून, ज्येष्ठ नागरीक मोठ्या प्रमाणावर मतदान करण्यासाठी दाखल झालेत. दिव्यांग मतदारांसाठी सुमारे ६०० बेस्ट बसची मोफत सेवा उपलब्ध करण्यात आली होती. मतदानाच्या प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी, आवश्यक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली. मुंबईतल्या धारावीमध्ये, धारावी ट्रान्झिट कॅम्प शाळा संकुलात, एकूण ३४ मतदान केंद्र उभारण्यात आली. या ठिकाणच्या मतदारांच्या मतपत्रिकेवर त्यांच्या मतदान केंद्रांच्या रंगाची पट्टी लावलेली होती. या मतदान केंद्रांना विविध रंगात विभागण्यात आलं, मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारापासून विविध रंगांचे कार्पेट अंथरले होते. यामुळ मतदारांना हा रंग आणि मतपत्रिकेवरचा रंग याआधारे त्यांचं मतदान केंद्र सहज शोधता आला. त्याचबरोबर याठिकाणी लहान मुले असलेल्या महिलांसाठी हिरकणी कक्ष, मतदारांसाठी प्रतीक्षा कक्ष उभारण्यात आला. ठाणे लोकसभा मतदारसंघात मतदारांना आकर्षिक करण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या. अनेक मतदान केंद्रांवर आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या. भिवंडी लोकसभा मतदारसंघातल्या, सारंग गावातलं मतदान केंद्र, आगरी-कोळी संस्कृतीनं सजवण्यात आलं होत.

**उर्वरित दोन टप्पे**

लोकसभा निवडणुकीच्या उर्वरित दोन टप्प्यांसाठीच्या प्रचाराला रंग चढतो आहे. विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचारसभा आणि रोड शोच्या माध्यमातून, प्रचार करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, ओडिशातल्या पुरी इथं रोड

शो केला, तसंच अंगुल इथं सभा घेतली. ढेंकनाल आणि कटकमध्ये प्रचारसभा घेऊन त्यांनी, सत्ताधारी बिजू जनता दलावर टीका केली.

**जनहित याचिका**

नुकत्याच अधिनियमित झालेल्या, भारतीय दंड संहिता, गुन्हेगारी दंड प्रक्रिया आणि भारतीय साक्षीपुरावा अधिनियमा विरोधात दाखल करण्यात आलेल्या, तीन जनहित याचिका, सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळल्या. यावर याचिका कर्त्यानं आपण दाखल करत असलेली जनहित याचिका काढून घेण्याची परवानगी मिळावी अशी विनंती न्यायालयाकडे केली आहे.

**एमएनएलयु**

महाराष्ट्र राष्ट्रीय कायदा विद्यापीठ अर्थात MNLU तर्फे पोलीस अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या प्रशिक्षणात नवीन भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय सक्षम अधिनियम २०२३ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अंमलबजावणी बाबत, माहिती आणि प्रशिक्षण देण्यात आलं. यावेळी चंद्रपूर आणि भंडारा इथले १५० पोलीस अधिकारी सहभागी झाले होते.

**पंतप्रधान मुलाखत**

काँग्रेसनं वेळोवेळी भारतीय राज्यघटनेचा अवमान केल्याचा आरोप पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी केला आहे. डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत, मोदी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान सभेच्या सदस्यांबद्दल त्यांना अत्यंत आदर आहे. यांनी सर्व आदरणीय लोकांनी अशी घटना तयार केली ज्यामुळ एक सामान्य चहा विक्रेत्याला पंतप्रधान बनण्याची संधी मिळू शकली. ते म्हणाले की,

***(होल्ड बाईट 25 सेकंद)***

***मैं डॉ.बाबासाहब आंबेडकर का, मैं संविधान सभा का, उस समय सभी महापुरुषोंका सर झुकाकर के प्रणाम करता हूँ की, उन्होंने देश को ऐसा संविधान दिया की, एक चायवाले का बेटा और मेरे देश के लोकतंत्र की ताकद देखिये, और उसने उसे,***

*प्रधानमंत्री बना दिया। मेरे लिए एक राजनेता के रूप में, एक जनप्रतिनिधि के रूप में, संविधान मेरा मार्गदर्शक है।*

ते म्हणाले, त्यांच्यासाठी राज्यघटना हा सरकार चालवण्यासाठी मार्गदर्शक आहे. ओडिशा, झारखंड, बिहार, बंगाल आणि पूर्व उत्तर प्रदेश यांसारख्या, देशाचा पूर्व भाग देशाच्या विकासाचे इंजिन बनतील असं देखील मोदी म्हणाले. आज भारताच्या नारी शक्तीची क्षमता सतत वाढत असून, त्यांच्यात अर्थव्यवस्थेचा पूर्णपणे कायापालट करण्याची क्षमता आहे. एका वृत्तसंस्थेला मुलाखत देताना मोदी म्हणाले की, आपण अल्पसंख्याकां विरोधात एक शब्दही बोलला नाही. मात्र आपण काँग्रेसच्या व्होट बँकेच्या राजकारणाच्या विरोधात आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासह भारताच्या संविधान निर्मात्यांनी धर्माच्या आधारावर आरक्षण दिलं जाणार नाही असा निर्णय घेतला असल्याचं, मोदी म्हणाले.

**बारावी निकाल**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं फेब्रुवारी- मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या, इयत्ता बारावीच्या परिक्षेचा निकाल, उद्या जाहीर होणार आहे. उद्या दुपारी एक वाजता, मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल जाहीर होणार असल्याचं, मंडळाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. एम.ए.एच. रिझल्ट डॉट एन.आय.सी. डॉट इन, डब्ल्यू.डब्लू.डब्लू डॉट महा एच.एस.सी.बोर्ड डॉट इन य, संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना निकाल पाहता येईल.

**इराण राष्ट्राध्यक्ष निधन**

इराणचे अध्यक्ष एब्राहिम रईसी यांचं हेलिकॉप्टर अपघातात निधन झाल्याची माहिती इराणच्या सरकारी दूरचित्रवाहिनीनं दिली आहे. त्यांच्यासोबत प्रवास करत असलेले परराष्ट्र मंत्री, होसैन अमीर-अब्दोल्लाहियान यांचंही निधन झाल्याचं वृत्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे अध्यक्ष, एब्राहिम रईसी यांच्या अपघाती निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. भारत आणि इराण यांच्यातले संबंध बळकट करण्यासाठी, रईसी यांनी दिलेलं योगदान कायम स्मरणात राहील असं पंतप्रधानानी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. परराष्ट्र व्यवहार

मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनीही इराणचे अध्यक्ष रईसी आणि परराष्ट्र मंत्री, अमीर अब्दोल्लाहियान यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं.

**बहुजन रंगभूमी**

नागपूर शहरातील बहुजन रंगभूमीच्या वतीनं विदर्भातील नव्या कलावंतांसाठी 27 मे पासुन चार जूनपर्यंत, दहा दिवसीय नाटक-चित्रपट अभिनय शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. हे शिबीर दोन गटात विभागले असून, नव्या युवा आणि बाल कलावंतांसाठी नागपूरातील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, छत्रपती चौक, वर्धा रोड इथं, दुपारी साडेचार ते सायंकाळी सातपर्यंत चालेल. शिबिरात सात ते तीस वर्षांपर्यंत वयाचे नवीन विद्यार्थी, सहभागी होवू शकतात. अधिक माहितीसाठी, वीरेंद्र गणवीर यांच्याशी ९७ ६५ ७१ ८० २२ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

**'शुन्य सावली' दिन**

आज दुपारी बारा वाजता वाशिमकरांनी सावली हरवल्याचा अनुभव घेतला. शून्य सावली दिवसाच्या वेळी या अनुषंगानं आज वाशीम जिल्ह्यातील नागरिकांची सावली पायाखाली आली. सावलीचे शिक्षण अधिक सुलभ व्हावं आणि सावलीबद्दलचे अनेक गैरसमज दूर व्हावेत या उद्देशानं भारतीय खगोल मंडळानं 'झीरो शॅडो डे' नावाचं ॲप लॉंच केलं आहे. हे ॲप मराठीसह विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा परिषद शाळा, कामरगाव तालुका कारंजा इथले शिक्षक, गोपाल खाडे यांनी दिली.

**आषाढी एकादशी**

आषाढी एकादशी सोहळा यंदा १७ जुलै रोजी साजरा होत असून, या पार्श्वभूमीवर सात ते २४ जुलै दरम्यान पंढरपुरात श्रीविठ्ठल आणि रुक्मिणी मातेचं दर्शन २४ तास सुरू ठेवण्यात येणार आहे. मंदिर व्यवस्थापनाचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी ही माहिती दिली. दर्शन रांग, दर्शन मंडप इथं व्यवस्थेसाठी दोन हजार कर्मचारी, स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे. तसंच भाविकांना अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला केल्याची माहिती शेळके यांनी दिली.

**हवामान**

प्रादेशिक हवामान विभागान वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भातील बुलढाणा अमरावती, यवतमाळ, वाशीम आणि अकोला जिल्ह्यांतील काही ठिकाणी, विजांच्या कडकडाटासह, वादळ, सोसाट्याचा वारा आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**बॅडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी जोडीनं थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या, पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. काल बँकॉक इथं झालेल्या अंतिम सामन्यात सात्विक-चिराग जोडीनं, के चेन बो यांग आणि लियू यी को, या चिनी जोडीचा, २१-१५, २१-१५ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव केला.

*****